**नियमित दिवाणी मुकदमा क्रं.६८/२०२०**
**सुशिलाबाई तातेराव गिते वि. प्रभाकर वैजनाथ मुंडे**
**मधील नि.क्र.४४ वरील आदेश**

१. वादीतर्फे प्रस्तुत अर्ज हा त्याचा सेकंडरी इव्हीडन्स देणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. सदर वादींकडून मिळकतीचा खरेदीखत नोंदणी क्रमांक २१५०/१९८१ दि.१२/०६/१९८१ रोजीचा खरेदी दस्त गहाळ झालेने त्याची सर्टीफाइड नक्कल हजर केली आहे. दावा मिळकतीचे खरेदीपत्राबाबतचा पुरावा रेकॉर्डवर घेणे आवश्यक असलेने व मुळ खरेदी दस्त उपलब्ध होत नसलेने दाव्याचे कामी दाखल केलेले दि.१२/०६/१९८१ रोजीचे खरेदीपत्राची सर्टीफाइड नक्कल सेकंडरी इव्हीडन्स म्हणून देणेबाबत परवानगी मिळणेसाठी विनंती केली आहे. सोबत वादीने त्याचे शपथपत्र देखील नि.४५ कडे दाखल केले आहे.

३. याउलट, प्रतिवादीने अर्जातील कथनांचा इन्कार करुन वाद मिळकतीचा दस्त हा वादीचेच ताब्यात असल्याचे कथन करुन केवळ दाव्यास विलंब व्हवा या हेतुन वादीने सदरचा अर्ज केला असलेने सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**३.** न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हक्क शाबीतीकरिता व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला असल्याचे दिसून येते. पुराव्याचा कायदा कलम ६५ चा विचार करिता जेंव्हा वादी एखादे कागदपत्र वाजवी वेळेत हजर करु शकत नाही व सदरचा वेळ ही त्याच्या दोषामुळे किंवा हलगर्जीपणामुळे नसेल त्यावेळी त्याला त्या कागदपत्रासंदर्भात दुय्यम पुरावा देण्याचा अधिकार आहे. अर्जदार याने दि. दि.१२/०६/१९८१ रोजीचा खरेदी दस्त क्रं २१५०/१९८१ गहाळ झाल्याने त्याची सर्टीफाइड नक्कल दाखल केली आहे व स्वतःच्या अर्जाच्या पुष्ठयर्थ शपथपत्र दाखल केले. तसेच, प्रस्तुत दावा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्यामुळे अर्जातील कारणे व दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदर वादीला त्याचा दुय्यम पुरावा दाखल करण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

1. अर्ज क्रं.४० मंजूर करण्यात येतो.
2. वादीला साठेखतासंदर्भात दुय्यम पुरावा देणेची परवानगी देणेत येते.

SD/-

**दि.१९/०४/२०२४** **(के.के.वाघमारे)**

**रेणापूर** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रेणापूर**